**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# शेतकरी अन् नव उद्योजकांसाठी शनिवारपासून पाटण महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** कोयना एज्युकेशन सोसायटी पाटण, बा. दे. कॉलेज, पाटण आणि रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने पाटण येथे २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत 'पाटण महोत्सव' साजरा होत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी, उद्योजक आणि नागरिकांना शेती, उद्योग, नवऊर्जा व स्थानिक उत्पादनांची माहिती मिळणार आहे, अशी माहिती कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण यांनी दिली.

यावेळी संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. विलासराव कळंत्रे, समन्वयक डॉ. हेमलता काटे, जगदीश शेंडे, सचिव विजय काटे, सदस्य डॉ. दीपक पाटील, डॉ. विनायक राऊत, डॉ. संतोष पाटील, डी. डी. थोरात, शिवहर आंबेगावे, अनिल पाटील, विनायक माथने, सतीश गायकवाड उपस्थित होते.

या महोत्सवात भात, नाचणीसह विविध धान्यांचे प्रदर्शन आणि थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. सुधारित बियाणे, सेंद्रिय शेती, काढणी-पश्चात प्रक्रिया आणि बाजारपेठेतील संधींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनांची थेट विक्री करता येणार असल्याने मध्यस्थांचा खर्च कमी होऊन उत्पन्नवाढीचा मार्ग खुला होणार आहे.

आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगांतील नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा उपाययोजना यांचे सादरीकरण येथे पाहायला मिळेल. खर्च कमी करून उत्पादन वाढविणारे पर्याय, सोलर पंप-पॅनल्ससारखी तंत्रे, तसेच ग्रामीण उद्योजकतेला चालना देणारी उत्पादने यामुळे शेतकरी व नवउद्योजकांना प्रत्यक्ष माहिती व व्यवहार्य पर्याय मिळणार आहेत.

> **'पाटण महोत्सव'चा उद्देश शेती-उद्योग-नवउर्जा-स्वयंरोजगार या सर्व घटकांना एकत्र जोडून ठेवणे हा आहे.**

माहिती, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा सेतू उभारून शेतकरी व उद्योजकांचे उत्पन्न वाढवणे, तसेच नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार स्थानिक उत्पादने उपलब्ध करून देणे, हीच या महोत्सवाची खास ओळख ठरणार आहे.